# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १५१-२२** **दिनांक :- २७/०५/२०२२**

## ७,५०,००० रू. किंमतीचा ५० ग्रॅम वजनाचा एम.डी. नावाचा अंमली पदार्थ बाळगणा-या इसमावर गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांची कारवाई

दिनांक २५/०५/२०२२ रोजी २०.०० वा चे सुमारास गुन्हे शाखा, कक्ष-२ चे अधिकारी व अंमलदार हे खाजगी वाहनाने गुन्हेगार वॉच पेट्रोलींग व अवैद्य धंद्यावर कारवाई करणेकामी फिरत असतांना नालासोपारा पुर्व, वालईपाडा रोड, मॉर्नीग स्टार स्कुल जवळ एक इसम घुटमळत असतांना दिसला त्याचा तेथे वावर संशयास्पद वाटल्याने पथकाने त्याचे जवळ जावुन त्यास हटकले असता तो पळुन जाण्याचा प्रयत्न करु लागल्याने त्यास पोलीस पथकाने २१.४५ वाजता जागीच थांबवुन पथकाने आपली ओळख दिली व त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने आपले नाव - नितेश रामप्रकाश पांडे, वय २५ वर्षे, रा. रामराज चाळ, असल्फां गाव, पाईप लाईन जवळ, घाटकोपर पश्चिम, मुंबई असे सांगितले. त्याचेबाबत संशय बळावल्याने तेथे लागलीच दोन पंचांना बोलावुन त्यांच्यासमक्ष सदर इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ७,५०,०००/- रुपये किंमतीचा ५० ग्रॅम वजनाचा एम.डी. नावाचा अंमली पदार्थ मिळुन आल्याने सदर आरोपी विरुध्द पो.हवा./ ९५०२१ मंगेश विठठल चव्हाण, नेम. गुन्हे शाखा कक्ष २ वसई, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद दिली असुन त्याबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ४५३/२०२२ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८ (क), २२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई श्री डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि/ सुहास कांबळे, सपोनि/ सागर शिंदे, स.फौ./रमेश भोसले, पो.हवा./मंगेश चव्हाण, संजय नवले, सचिन पाटील, प्रशांत पाटील, पो.ना./प्रशांतकुमार ठाकुर, जगदीश गोवारी, पो.शि/अमोल कोरे, यांनी केली आहे.